# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, ठाणे शहर

## P.R.O. OFFICE, DCP ZONE-1, THANE CITY

Address- Office of Dy. Commissioner of Police, Zone-01

Near Central Ground, Thane (w)

Email Id- cp.thane.dcpzone1@mahapolice.gov.in Contact No: +919594438311


प्रेस नोट क्रमांक दिनांक :– 30/03/2024

**शिळ डायघर पोलीस स्टेशन, ठाणे शहर हद्दीतील दखलपात्र गुन्हे करण्याच्या उददेशाने अवैध हत्यारांचा साठा करणारे व रिक्षा चोरी करणारे आरोपी जेरबंद**

गुन्हा दाखल : दि. 30/03/2024 रोजी 01:00 वा ते 2:00 वा चे सुमारास पोउनि/ संकेत शिंदे हे तपास पथकातील अंमलदार असे वरिष्ठांचे आदेशाने शिळफाटा येथे नाकाबंदी कर्तव्य करत असतांना रात्रौ 01.45 वा. सुमारास मुंब्रा पनवेल रोडने मुंब्रा दिशेने भरधाव वेगात येत असलेली एक रिक्षा पाहिली. त्यामध्ये दोन व्यक्ती बसलेले होते. त्यांच्यावर संशय आल्याने रिक्षा रोडच्या कडेला थांबवण्यास सांगून रिक्षा थांबवून ॲटो रिक्षातील इसमांना विचारपुस करणेस जात असताना रिक्षात पाठीमागे बसलेले एक संशयीत इसम रिक्षातुन उतरून पळुन जात असताना पोउनि/शिंदे यांनी त्यास आवाज देउन थांबण्याचा इशारा केला असता, तो न थांबता पळुन जात होता. त्यास सोबत असणारे स्टाफच्या मदतीने पाठलाग करून ताब्यात घेऊन त्याचेकडे विचारपुस केली असता तो उडवाउडविची उत्तरे देऊ लागल्याने पोउपनि/संकेत शिंदे यांनी दोन पंचाना बोलावून त्यांना नांव पत्ता विचारून त्यांची अंगझडती घेतली असता एक लोखंडी कोयता, एक रेडमी कंपनीचा मोबाईल फोन, दोन लोंखडी तलवार मिळून आले. त्यांचे ताब्यातील रिक्षाचे कागदपत्राबाबत विचारपूस केली असता सदरची रिक्षा ही दोन्ही आरोपीत आपसात मिळून अभयनगर परिसरातून चोरी केल्याची कबूली दिली. त्या अनुशंगाने शिळ डायघर पोलीस ठाण्यातील गुन्हे अभिलेख तपासला असता सदर रिक्षा ही शिळ डायघर पो. स्टे. गुन्हा रजि. क्र. 584/2024 भा.द.वि.क 379 प्रमाणे गुन्हयातील असल्याचे निष्पन्न झाले. सदरची रिक्षा व मुदद्देमाल हस्तगत करण्यात आली आहे. त्यामुळे नमुद आरोपी इसमांविरूध्द शिळ डायघर पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नं. 706/2024 भारतीय हत्यार कायदा कलम 4,25 सह महा. पो. का. क. 37(1), 37(3), 135 प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला व तपास चालु आहे.

गुन्हयाचा तपास :– यातील अटक आरोपीत यांच्याकडे अटकेनंतर गुन्हयाच्या अनुशंगाने सखोल तपास केला असता, आरोपी नामे अरबाज शेख याने त्याचे निवदेन पंचनाम्यामध्ये दोघांनी मिळून चोरून आणलेल्या दोन ॲटा रिक्षा दाखविल्याने जप्त करण्यात आल्या आहे. त्यापैकी रिक्षा नं रिक्षा नंबर MH04/HJ/2931 मुंब्रा पो.स्टे. ठाणे गुन्हा रजि नं 638/2024 भा.द.वि. कलम 379 या दाखल गुन्हयातील चारोची असल्याचे निष्पन्न झाले. तसेच ॲटा रिक्षा क्र. MH.04.JH-3093 दाखल गुन्हयातील चारोची असल्याचे निष्पन्न झाले. तसेच आरोपी नामे गौरव उर्फ बाल्या याच्या घरघडतीमध्ये 7 वेगवेगळया वर्णनाचे तलवार, सुरा, कायता मिळून आल्याने जप्त करण्यात आले आहे. अटक आरोपीत यांच्याकडे केलेल्या प्राथमिक तपासात रिक्षा चोरीचे 3 गुन्हे उघडणीस आणले आहे.

1) गौरव उर्फ बाल्या शिवराम वाघे, वय 19 वर्षे, धंदा– बेकार, राह. स्वतःचे घर, माणिकपाडा, भंडार्ली गाव, मुंब्रा पनवेल रोड, ता.जि. ठाणे
2) अरबाज शौकत अली पठाण, वय 20 वर्षे, धंदा–बेकार, राह. रूम नं 6, बाबाजी पाटील चाळ, मुंब्रा पनवेल रोड, माणिकपाडा, भंडार्लीगाव ता.जि. ठाणे

जप्त मुद्देमाल

1) 5,000/– रू. किंमतीचा रेडमी कंपनीचा निळया रंगाचा मोबाईल फोन डीस्पले बंद असलेला. जु.वा.की.सु.
2) 250/– रू. किंमतीचा धारदार असलेला लोखंडी कोयता, त्याची पत्याची लांबी 22 से.मी., मुठ 18 से.मी. एकुण लांबी 40 सें.मी. मध्यभागी 5 से.मी. रूंदी असलेला.
3) 300/–रू किंमतीची एक धारदार लोखंडी तलवार तीचे पात्याची लांबी 47 से.मी असुन रूंदी 3 से.मी. व मुठीची लांबी 11 से.मी. पुढील बाजूस निमुळती असलेली एकूण 58 से.मी. जु.वा.
4) 400/– रू किंमतीची एक धारदार लोखंडी तलवार तीचे पात्याची लांबी 57 से.मी. असुन रूंदी 5 से.मी. व मुठीची लांबी 12 से.मी. पुढील बाजूस निमूळती असलेली व पुढील बाजूस 8 दाते असलेली एकूण 69 से.मी. जू.वा.
5) 80,000/–रू.कि.रिक्षा नंबर MH04/KA/3482 इंजि नंबर AZYWKD97014, चेसिस नंबर MD2A27AY6KWD79966, काळया पिवळया रंगाची,सन 2019 चे मॉडेल ( गुन्हा रजि नं 584/2024 भा.द.वि.कलम 379 मधील चोरीस गेलेली रिक्षा)

---

85,950/– एकुण किंमत सुमारे.

आरोपी अरबाज पठाण याचे निवेदन पंचनाम्याप्रमाणे जप्त मुद्देमाल ( दोन रिक्षा )

60,000/- रू. कि.ची एक अटो रिक्षा नंबर MH04/HJ/2931 इंजि नंबर 24ZWGB36896, चेसिस नंबर MD2A24AZ5GWV20898 , काळया पिवळया रंगाची,सन 2016 चे मॉडेल ( मुंब्रा पो.स्टे. ठाणे गुन्हा रजि नं 638/2024 भा.द.वि.कलम 379 मधील चोरी केलेली रिक्षा )

60,000/- रुपये किंमतीचा एक बजाज कंपनीची पिवळया काळया रंगाची ॲटा रिक्षा क्र. MH.04.JH-3093 तिचा चेसिस नं. MD2A27AY7JWK38786 इंजिन नं AZYWJK01667 सन 2018 मॉडेल जु. वा. कि. (शिळ डायघर पो.स्टे. ठाणे गुन्हा रजि नं 147/2023 भा.द.वि.कलम 379 मधील चोरी केलेली रिक्षा )

---

1,20,000/- एकुण किंमत सुमारे.

गौरव उर्फ बाल्या शिवराम वाघे याचे घरझडती पंचनाम्याप्रमाणे जप्त मुद्देमाल

1) 300/- रू किंमतीची एक धारदार लोखंडी तलवार तीचे पात्याची लांबी 56 से.मी. असुन रूंदी 5 से.मी. व मुठीची लांबी 13 से.मी. पुढील बाजूस निमुळती असलेली एकूण 69 से.मी. जु.वा.
2) 300/- रू किंमतीची एक धारदार लोखंडी तलवार तीचे पात्याची लांबी 58 से.मी. असुन रूंदी 7 से.मी. व मुठीची लांबी 13 से.मी. पुढील बाजूस निमुळती असलेली एकूण 71 से.मी. जु.वा.
3) 300/- रू किंमतीची एक धारदार लोखंडी तलवार तीचे पात्याची लांबी 44 से.मी. असुन रूंदी 4 से.मी. व मुठीची लांबी 12 से.मी. पुढील बाजूस निमुळती असलेली एकूण 56 से.मी. जु.वा.
4) 200/- रू.किंमतीचा धारदार असलेला लोखंडी कोयता, त्याची पत्याची लांबी 22 से.मी., मुठ 16 से.मी. भागी 5 से.मी. रूंदी एकुण लांबी 38 सें.मी. पुढील बाजूस निमुळता असलेला.
5) 150/- रू किंमतीचा धारदार असलेला लोखंडी सुरा त्याची पत्याची लांबी 25 से.मी., मुठ 11 से.मी. 5 से.मी. रूंदी एकुण लांबी 36 सें.मी. पुढील बाजूस निमुळता असलेला
6) 150/- रू किंमतीचा धारदार असलेला लोखंडी सुरा त्याची पत्याची लांबी 30 से.मी., मुठ 15 से.मी. 4 से.मी. रूंदी एकुण लांबी 45 सें.मी. पुढील बाजूस निमुळता असलेला
7) 150/- रू किंमतीचा धारदार असलेला लोखंडी सुरा त्याची पत्याची लांबी 19 से.मी., मुठ 13 से.मी. 3 से.मी. रूंदी एकुण लांबी 32 सें.मी. पुढील बाजूस निमुळता असलेला

---

1550/- एकुण किंमत

हत्यार बाळगण्याचा उद्देश :- यातील अटक आरोपीत हे दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्दशाने सदर हत्यार बाळगले असावेत असे निष्पन होत असून त्यांच्याकडे पोलीस कोठडी दरम्यान अधिक चौकशी करीत आहोत.

मार्गदर्शन :-_ अशा प्रकारे सदरची यशस्वी कामगिरी मा.पोलीस आयुक्त श्री.आशुतोष डुंबरे, मा. पोलीस सह आयुक्त श्री ज्ञानेश्वर चव्हाण, मा.अप्पर पोलीस आयुक्त श्री विनायक देशमुख, मा. पोलीस उप आयुक्त श्री. सुभाष बुरसे, परिमंडळ 1, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. उत्तम कोळेकर, कळवा विभाग, शिळ डायघर पो.स्टे.चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदिपान शिंदे, पो.नि.(गुन्हे)सुनिल वरुडे यांच्या मार्गदर्शनाखाली शिळ डायघर पो.स्टे. अंतर्गत तपास पथकातील पोउपनि/संकेत शिंदे, पोहवा/नागराज सोनकडे, पोहवा/रतिलाल वसावे, पोहवा/महेद्रं लिंगाळे, पोहवा/मुकूंद आव्हाड, पोशि/विजय खाडे, पोशि/सुशिल पवार यांनी सदर गुन्हयाचा कौशल्यपूर्ण तपास करून गुन्हे उघडकीस आणले आहे.